# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.03.2026** **वारः मंगळवार**

---

•महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर

•धर्मस्वातंत्र्य विधेयक कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही, तर बेकायदा धर्मांतराला प्रतिबंध करण्यासाठी असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

•सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्या १८ जणांना राज्यात अटक, बाराशेहून अधिक सिलिंडर जप्त

•मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील ८६४ सदनिकांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण

आणि

•लेखक, चित्रकार राजू बाविस्कर यांच्या "काळ्यानिळ्या रेषा" या आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर

**विधीमंडळप-**

सक्तीने आणि प्रलोभन दाखवून होणाऱ्या धर्मांतराला प्रतिबंध घालणारं महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक काल विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आलं. हे विधेयक कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून बेकायदा धर्मांतराला प्रतिबंध करण्यासाठी आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधेयकावर चर्चेला सुरुवात करताना सांगितलं. या विधेयकानुसार बेकायदा धर्मांतरासाठी केलेला विवाह रद्द केला जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. कोणत्याही व्यक्तीला अथवा संस्थेला धर्मांतर करण्यासाठी योग्य त्या प्राधिकरणाकडे आगाऊ नोटीस द्यावी लागेल. त्यानंतर संबंधित प्राधिकरण हे अशा पद्धतीचं धर्मांतर योग्य आणि स्वच्छेनं आहे की नाही याची चौकशी करेल. अशी नोटीस दिली नसेल तर सदर धर्मांतर रद्द केले जाईल. अशा धर्मांतरातून लग्न होऊन नंतर लग्नविच्छेद झाल्यावर तो विवाहदेखील रद्द ठरवण्याचा अधिकार न्यायालयांना असणार आहे. अशा पद्धतीच्या धर्मांतराबद्दल

असलेल्या तक्रारी केवळ रक्ताच्या नात्याकडून असलेल्या नातेवाईकांना अथवा पोलिसांना करता येतील. यासाठी विविध पातळ्यांवर दंडाची आणि कारावासाची तरतूद केली आहे, अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली.

अनेक वेळा धर्मांतराच्या मुद्द्यावर कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होते. प्रचलित कायद्यात याबाबत सुस्पष्ट तरतुदी नाहीत, त्यामुळे नव्या कायद्याची गरज आहे असं मुख्यमंत्री म्हणाले.

धर्मस्वातंत्र्य विधेयक हे संविधानाच्या विरोधात आहे अशी टीका अस्लम शेख यांनी केली. यामुळे दोन सज्ञान व्यक्तींना एकमेकांशी विवाह करायचा असेल आणि त्यांच्या कुटुंबियांनी तक्रार केली तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल अशी भीती शेख यांनी व्यक्त केली.

धर्मस्वातंत्र्य विधेयकानुसार ज्याच्यावर धर्मांतर घडवून आणल्याचा आरोप आहे त्यालाच निर्दोषत्व सिद्ध करावं लागणार आहे, ही अन्याय्य बाब असून यामुळे गैरवापर होईल, अशी भीती भास्कर जाधव यांनी व्यक्त केली. याचा सरकारनं फेरविचार करावा अशी सूचना त्यांनी केली.

हे विधेयक एकतर्फी असून केवळ एका धर्माला लक्ष्य करण्यासाठी आहे असा आरोप समाजवादी पक्षाचे सदस्य रईस शेख यांनी यावेळी केला. ज्या अहवालाच्या आधारे हे विधेयक सादर केलं आहे तो अहवाल कुठं आहे, असा सवाल करत त्यांनी विधेयकाला विरोध केला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी या विधेयकाला पाठिंबा असल्याचं विधिमंडळ परिसरात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

विनियोजन विधेयक २०२६ काल विधानसभेत आवाजी मतदानानं मंजूर झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक सभागृहात मांडलं. त्याआधी अर्थसंकल्पातल्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होऊन त्या मंजूर झाल्या.

एलपीजीच्या काळाबाजार प्रकरणी विविध जिल्ह्यात नेमलेल्या समित्यांनी आत्तापर्यंत १ हजार २०८ सिलेंडर जप्त केले असून, २३ गुन्हे दाखल करून १८ जणांना अटक केल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी काल विधानपरिषदेत दिली. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ३३ लाख ६६ हजार रुपयांपेक्षा जास्त असल्याचं त्यांनी सांगितलं. उद्भवलेली परिस्थिती लक्षात घेता एलपीजीला पर्याय म्हणून रॉकेल उपलब्ध करायचा विचार सरकार

करत असून, याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला पत्राद्वारे कळवलं आहे, अशी माहितीही भुजबळ यांनी दिली. युद्धजन्य परिस्थितीमुळे खाद्यतेलाच्या दरात साधारण वाढ झाली आहे, असंही ते म्हणाले.

**<u>मुख्यमंत्रीबीडीडी</u>**

मुंबईतील मध्यमवर्गीयाच्या घराचं स्वप्न साकार करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचा विकास होऊन रहिवाशांच्या जीवनमानात मोठी सुधारणा होणार असल्याचं सांगून बीडीडी चाळीतील रहिवाशांनी आपली घरं विकू नये, असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं. मुंबईतील नायगाव बिडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संकुलातील ८६४ सदनिकांचं वितरण काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. मुंबईतला माणूस हा मुंबईतच राहावा यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे; मुंबईतल्या सामान्य माणसाला घर देतानाच त्याच्या आयुष्यात गुणवत्तापूर्ण परिवर्तन आणलं जाईल असं मुख्यमंत्री म्हणाले............

**<u>Intro</u>**

**<u>साहित्यअकादमी-महासंवाद</u>**

2025 या वर्षासाठीच्या साहित्य अकादमी पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली आहे. देशातील २४ भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींना यंदाचे साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाले असून मराठी भाषेतील ‘काळ्यानिळ्या रेषा’ या आत्मकथेसाठी लेखक राजू बाविस्कर यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. बाविस्कर हे सेवानिवृत्त कलाशिक्षक असून जळगाव जिल्ह्यात ते कार्यरत होते. काळ्या निळ्या रेषा या पुस्तकाची सुरुवात विदर्भ साहित्य संघाच्या युगवाणी या नियतकालिकातून झाली आहे, असं राजू बाविस्कर यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

**<u>इंट्रो-इथेनॉल</u>**

आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक ठिकाणी व्यावसायिक गॅसचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील संजीवनी उद्योग समूह आणि शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हचे यशस्वी संशोधन केलं आहे. ऐकुयात अधिक माहिती आमच्या प्रतिनधीकडून...........

स्क्रिप्ट : पुण्यातील एका संस्थेच्या सहकार्याने व्यावसायिकांना परवडेल अशा दरात याची निर्मिती करण्यात आली आहे. देशात सध्या १००० कोटी लिटर अतिरिक्त इथेनॉल उपलब्ध असून, त्याचा वापर घरगुती आणि व्यावसायिक स्वयंपाकासाठी केल्यास गॅसवरील अवलंबित्व कमी होऊ शकते. हा पर्याय व्यावसायिक गॅसपेक्षा अधिक किफायतशीर ठरण्याची शक्यता आहे. या संशोधनाबाबत आणि त्याच्या उपयोगितेते बाबत बोलताना संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष विवेक कोल्हे म्हणाले........

**कॅप्सुल**

भविष्याचा वेध घेता इथेनॉल फक्त इंधन निर्मितीसाठी नव्हे तर इतरही प्रकारचे योगदान या ठिकाणी इथेनॉल देऊ शकत. कमर्शियल एलपीजी सिलेंडर ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात हॉटेल व्यवसायिकांमध्ये काही प्रमाणात अडचण आलेली असा आपल्याला दिसून आलेला आहे. त्याला एक सक्षम पर्याय म्हणून इथेनॉल कुकिंग स्टोव्ह होऊ शकता आणि तसे प्रात्यक्षिक अनेक देशांमध्ये चालू आहे. हे निश्चितपणाने शासनाने तसं धोरण घेतलं तर हा जो काही अन्नदाता आहे तो ऊर्जा दाता इंधनामध्ये बचत करून झालेलाच आहे परंतु या एलपीजीला देखील पर्याय म्हणून त्या ठिकाणी पुढे येऊ शकतो. भारतीय शेतकऱ्यांकडून तयार झालेला आहे 5 शे ते 600 कोटी लिटर जर अधिकचा उत्पन्न झालं तर अधिक सक्षम किंवाबळकटी कारखानदारीला देखील याच्यातून नवऊर्जा या निमित्ताने मिळणार आहे.

सध्या कोल्हे कारखान्याकडे एक हजार स्टोव्ह तयार असून त्यांना सरकारच्या मान्यतेची प्रतीक्षा आहे. व्यवसायिक इंधन तुटवड्याच्या  काळात सरकारने याला परवानगी दिली तर नागरिकांसाठी हा मोठा दिलासा ठरू शकतो. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी अहिल्यानगरहून मनोज सातपुते.

**जिल्हापरिषद**

रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा म्हणून अस्मिता केंद्रे आणि उपाध्यक्ष म्हणून विलास चाळके यांची बिनविरोध निवड झाली. त्यांनी काल पदभार स्वीकारला. दोन्ही नेते अनुभवी असून, शिवसेनेतर्फे ही निवड १५ महिन्यांसाठी करण्यात आली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी भाजपचे प्रमोद कामत यांची तर उपाध्यक्षपदी शिवसेनेचे तुकाराम उर्फ दादा साईल यांची बिनविरोध निवड झाली आहे. ५० सदस्य संख्या असलेल्या सभागृहात महायुतीचे ४१ सदस्य आहेत.

**<u>हवामान</u>**

मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी काल पाऊस पडला. विदर्भात काही ठिकाणी कमाल तापमानात उल्लेखनीय वाढ झाली आहे.  येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**